महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
**ठाणे शहर**

क्र./पोउपआ/वा.विभाग /प्रशा –१/ २१ /२०१६
पोलीस उपायुक्त, वाहतुक विभाग ,यांचे कार्यालय
ठाणे शहर ,दिनांक – २९ /०२/२०१६

संदर्भ :– वाहतुक नियंत्रण अधिसुचना क्र.पोउपा/वा.विभाग/प्रशा–१/२१/२०१६ दि.२९–०२–२०१६

## '' वाहतुक नियंत्रण अधिसुचना ''

ज्याअर्थी, ठाणे शहरातील क्रिकनाका ते आकाशगंगा रोडवरील क्रांतीनगर नाल्यापर्यंतच्या ठाणे मध्यवर्ती कारागृहाच्या सुरक्षित भिंतीलगतच्या रोडवर मोठया प्रमाणात पार्किंग होणा–या ट्रक, टेंम्पो, बसेसमुळे कारागृहाच्या आतील व बाहेरील सुरक्षेस धोका निर्माण झालेबाबत सिक्युरिटी ऑडीट मध्ये निष्पन्न झाले आहे ; आणि,

ज्याअर्थी, या मार्गावर होणा–या वाहतुक कोंडीमुळे शाळेत जाणारी लहान मुले, नोकरीच्या ठिकाणी जाणारी चाकरमान मंडळी, रुग्णवाहिका व जीवनावश्यक सोईसुविधा पुरविणारी छोटी वाहने यांचे सुकर मार्गक्रमणास नित्याची बाधा निर्माण होत आहे ; आणि,

ज्याअर्थी, या मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना पार्किंग करण्यास मनाई केल्यास वरील समस्येचे निराकरण करणे शक्य असल्याची माझी खात्री झाल्याने **क्रिकनाका ते आकाशगंगा रोडवरील क्रांतीनगर नाल्यापर्यंतच्या ठाणे मध्यवर्ती कारागृहाच्या सुरक्षित भिंतीलगतच्या रोडवर** सर्व प्रकारच्या वाहनांना पार्किंग करणेस मनाई **( No Parking )** करण्यात आली होती व त्याबद्दल सर्व संबधितांचे अभिप्राय मागविण्यात आले होते व याप्रकरणी कोणाचेही अभिप्राय अगर सुचना अद्यापपर्यंत प्राप्त झालेल्या नाहीत ;

त्याअर्थी, मी, संदीप भा. पालवे, मला ठाणे शहर वाहतुक विभागाचा पोलीस उपायुक्त म्हणुन महाराष्ट्र शासन, गृहविभाग क्र.एम.व्ही.ए.११६/सीआर/३७/टीआर दि.२७–०९–१९९६ चे अधिसुचनेनुसार व मोटार वाहन कायद्याचे कलम ११५, ११६(१)(अ)(ब) अन्वये प्राप्त अधिकारानुसार व त्याअनुषंगिक कर्तव्यार्थ, ठाणे मध्यवर्ती कारागृहाची अंतर्गत व बाहेरील सुरक्षा व व्यापक जनहित विचारात घेउन संदर्भीय अधिसुचना यापुढे कायम करित आहे.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

(संदीप भा.पालवे)
पोलीस उपायुक्त,वाहतुक विभाग,
ठाणे शहर.

प्रत :- संचालक, शासकीय मुद्रण व लेख्न सामुग्री, चर्नी रोड, मुंबई.
२/- या अधिसुचनेची प्रसिध्दि राजपत्रात करणेस विनंती आहे.

प्रत :- जिल्हा प्रसिध्दि अधिकारी, ठाणे
२/- कृपया त्यांनी या अधिसुचनेची प्रसिध्दि व्यापक स्वरुपात करावी.

पुढील पृष्ठावर सुरु :-

प्रत सविनय सादर :- मा.आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

२/- आपणास विनंती करण्यात येते की, आपण मोटार वाहन कायद्याचे कलम ११६(१)(अ)(ब) अन्वये संबंधित ठिकाणी सुयोग्य दिशादर्शक फलक लावणेबाबत अधिनस्थ अधिका-यांना आदेश निर्गमित करावेत.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-
१.मा.पोलीस आयुक्त सो, ठाणे शहर
२.मा.पोलीस सह आयुक्त सो, ठाणे शहर.

प्रत कार्यवाहीस्तव :- सपोआ.ठाणे वाहतुक विभाग, ठाणे. / पोनि.राबोडी वाहतुक उपविभाग, ठाणे

प्रत :- पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे विभाग, ठाणे.
२/- कृपया त्यांनी सदरची अधिसुचना ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

प्रत :- समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे शहर.
२/- त्यांनी याबाबतची प्रसिध्दि ई पोलीस पत्रकात द्यावी.